पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय
जा.क्र.कप्र/ काવि/६४८ /२०१४
दिनांक- १५ / १ /२०१४

प्रति,

मा.नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८.
मा.सर्व सन्मा.नगरसदस्य/नगरसदस्या
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८.

विषय – क प्रभाग समितीच्या कामकाजाबाबत.
संदर्भ- १. क प्रभाग समितीचा ठ.क्र.२ दि. ५/४/२०१३
२. क प्रभाग समिती कार्यपत्रिका क्रमांक १० दि. ८/१/२०१४
३. क प्रभाग समिती विशेष सभा कार्यपत्रिका क्रमांक-११ दि. १३/१/२०१४
४. क प्रभाग समिती विशेष सभा कार्यपत्रिका क्रमांक-१२ दि. १३/१/२०१४
५. मा.सिमा सावळे यांचे दि. १५/१/२०१४ चे पत्र त्यावरील मा.आयुक्त सो. यांचे नगरसचिव यांनी माहिती घेवून सादर करणेबाबतचा शेरांकन.
६. मा.नगरसचिव पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.नस/४/कावि/५५/२०१४ दि. १५/१/२०१४

महोदय,

क प्रभाग समितीची सभा ठराव क्र-२ नुसार क प्रभाग समितीच्या मासीक सभेचा दिनांक व वेळ निश्चित करणे- क प्रभाग समितीची मासिक सभा ही प्रत्येक महिन्याचे पहिल्या बुधवारी दुपारी ३.०० वाजता ( पहिल्या बुधवारी सार्वजनिक सुट्टी असेलतर दुस-या दिवशी) क प्रभाग कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेकामी मान्यता देणेत येत आहे. याप्रमाणे ठराव आहे.


दिनांक १९/१२/२०१३ रोजी मा.आध्यक्षा क प्रभाग समिती यांनी त्यांचे पत्रानुसार दि. १/१/२०१४ रोजीची माहे जानेवारीची होणारी मासीक सभा ही दि. ८/१/२०१४ रोजी घेणेबाबत आदेश दिले त्यानुसार दि. १/१/२०१४ रोजीची सभा दि. ८/१/२०१४ रोजी दुपारी ३/- वाजता घेणेबाबत कार्यक्रमपत्रिका क्रमांक १० दि. ४/१/२०१४ ची सर्व संबंधीत नगरसदस्य यांना चार दिवसाचे आत देणेत आली. त्यानुसार दि. ८/१/२०१४ रोजी दुपारी क प्रभाग समितीची सभा श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये हजर सदस्यांनी सदरची सभा ही ठरावानुसार प्रत्येक महिन्याच्या पहिल्या बुधवारी घेणे आवश्यक होते त्यानुसार दि. ८/१/२०१४ रोजी घेतलेली ही सभा ठरावानुसार न घेतलेने सर्वानुमते सदरची सभा रद्य करणेत आली असून पुढील मासीक सभा नियमानुसार घेणेत यावी असा ठराव झाला.

दि. १३/१/२०१४ चे मा.अध्यक्ष यांचे आदेशानुसार कासारवाडी नाशिक फाटा येथील झालेल्या दुमजली उड्डाणपुलास जे.आर.डी.टाटा उड्डाणपुल असे नामकरण करणेबाबत विषयपत्रिका क्रमांक ११ नुसार विशेष सभा घेणेबाबत सन्मा.नगरसदस्यांच्या पत्रानुसार विशेष सभेचे विषयपत्र सर्वसंबंधीतांना बजावले. सदर सभा ही गुरुवार दि. १६/१/२०१४ सकाळी ११.३० वाजता होणार आहे. सदर विषयपत्रीकेवर मा.नगरसदस्या सिमाताई सावळे

व सन्मा.आशाताई शेंडगे यांनी हरकतीचे पत्र दिल्यामुळे दि.१५/१/२०१४ रोजीच्या पत्रावर नगरसचिव माहिती घेवून सादर करा असे मा.आयुक्त यांनी आदेश दिले. तसेच मा.नगरसचिव यांनी दि. १५/१/२०१४ च्या आदेशान्वये मा.प्रभाग अधिकारी, क प्रभाग यांना कळविले आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची प्रकरण २ मधील नियम १ (ह) नुसार विहीत कालावधीची नोटिस " विशेष सभेकरिता " देणे आवश्यक असल्याने त्यानुसार विशेष सभेबाबत उचित कार्यवाही करणेत यावी. तसेच मा.आयुक्त सो. यांनी मा.नगरसचिव यांना दि. ८/१/२०१४ ची मासीक सभा व दि. १६/१/२०१४ ची विशेष सभा रद्य करणेबाबत आदेश दिलेले आहेत असे मा.नगरसचिव यांनी सांगीतले असून त्यानुसार मा.नगरसचिव यांनी सदरचा दोन्ही सभा रद्य कराव्यात असे आदेश दिले आहेत.

सबब मा.आयुक्त सो. व मा.नगरसचिव यांचे आदेशानुसार दि. ८/१/२०१४ ची (कार्यपत्रिका क्र-१०) मासीक सभा व दि. १६/१/२०१४ ची (कार्यपत्रिका क्र-११) विशेष सभा रद्य करणेत येत आहे.

कळावे.



प्रशासन अधिकारी तथा सचिव
क प्रभाग
क प्रभाग कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत-१)मा.आयुक्त सो.
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
२) सर्व संबंधीत विभाग